**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण**

Maharashtra Housing & Area Development Authority

**जनसंपर्क विभाग**

कक्ष क्र. १९/२०, तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर,
वांद्रे पूर्व, मुंबई - ४०००५१. दू. क्र. :- ०२२ ६६४०५०७७,
६६४०५०६६ ई मेल - cpromhada@gmail.com


=====================================================================

जावक क्रमांक – ११८५ दिनांक :- २५ मार्च, २०२२

प्रसिद्धीपत्रक

**म्हाडा अभय योजना**

# मुंबई शहर व उपनगरातील म्हाडा वसाहतींतील रहिवाशांना थकीत सेवाशुल्काचा दुसरा हप्ता भरण्याची मुदत ३१ मार्चपर्यंत

**नागरिकांच्या सोयीकरिता म्हाडा वसाहतींतील भाडेवसूली कार्यालये येत्या शनिवारी आणि रविवारी सुरु**

मुंबई, दि. २५ मार्च, २०२२ - म्हाडाच्या मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या वसाहतींमधील सहकारी गृहनिर्माण संस्था तसेच रहिवाशी यांच्याकडून थकीत सेवाशुल्कावरील व्याज रद्द करून सेवाशुल्क वसुलीसाठी शासन निर्णयानुसार सुरु केलेल्या अभय योजनेअंतर्गत थकीत वसूली योग्य सेवाशुल्काचे विभागणी पाच वर्षात १० समान हप्त्यांत करण्यात आली असून थकीत सेवाशुल्काचा दुसरा हप्ता भरण्याची मुदत दि. ३१ मार्च, २०२२ पर्यंत असून नागरिकांच्या सोयीकरिता म्हाडा वसाहतींतील भाडे वसुली कार्यालये येत्या शनिवारी आणि रविवारी सुरु ठेवण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे.

सदरील अभय योजनेचा जास्तीत जास्त म्हाडा सदनिका धारकांनी लाभ घेण्याचे आवाहन केले असून थकीत सेवाशुल्काचा भरणा रहिवाशांना विहित मुदतीत करता यावा तसेच नियमित मासिक सेवाशुल्काचाही भरणा करता यावा, यासाठी शनिवार दि. २६ मार्च, २०२२ व रविवार दि. २७ मार्च , २०२२ रोजी मुंबई मंडळातर्फे संबंधित मिळकत व्यवस्थापक यांच्या कार्यक्षेत्रातील भाडेवसूली कार्यालये सुरु ठेवण्यात येणार आहेत. सेवाशुल्क भरण्याकरिता ई-बिलिंग संगणकीय प्रणाली कार्यरत असून म्हाडा वसाहतीतील गाळेधारकांना घरबसल्या सेवाशुल्कही भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

मुंबई मंडळाच्या अखत्यारीत ११४ अभिन्यास असून ५६ हून अधिक वसाहती आहेत. या वसाहतींना म्हाडा तर्फे ज्या सेवा पुरविल्या जातात त्यापोटी या वसाहतींमधील रहिवाशांकडून सेवाशुल्क आकारले जाते. सेवाशुल्क आकारणीच्या बदल्यात म्हाडा पंप हाऊसची देखभाल, पंप चालकाचे वेतन, टँकर्सची आपत्कालीन दुरुस्ती, स्वच्छता कर्मचाऱ्यांचे वेतन, स्वच्छतेसाठी लागणारे साहित्य इत्यादीसारख्या सुविधा मंडळातर्फे पुरविल्या जातात.

शासन निर्णयानुसार मुंबई मंडळातर्फे सेवाशुल्क वसुलीकरिता एप्रिल -२०२१ पासून अभय योजना राबविण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत मुंबई मंडळांच्या विविध योजनांतील गाळेधारकांकडून दि. १ एप्रिल, १९९८ ते दि. ३१ मार्च, २०२१ या कालावधीची सुधारित दराने येणे असलेली रक्कम व प्रत्यक्ष भरणा केलेली रक्कम यांचे समायोजन करून दि. ३१ मार्च, २०२१ रोजी येणे असलेली उर्वरित रकमेची मागणी गाळेधारकांकडे केली जात आहे. तसेच वसूल होण्यासाठी प्रोत्साहनात्मक बाब म्हणून या थकीत सेवाशुल्काच्या वसूल योग्य रकमेवरील दि. १ एप्रिल, १९९८ ते दि. ३१ मार्च, २०२१ या कालावधीचे त्यावर होणारे व्याज माफ करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे.

मुंबई मंडळाने थकीत सेवाशुल्काची वसूल योग्य रक्कम पुढील ५ वर्षात १० समान हप्त्यात भरणा करण्याची सवलत गाळेधारकांना अभय योजनेअंतर्गत दिली आहे. १० समान हप्त्यांपैकी प्रत्येक हप्ता भरणा करण्यासाठी ६ महिन्याचा कालावधी देण्यात आला आहे. प्रत्येक हप्त्याच्या दिलेल्या मुदतीत थकीत सेवाशुल्काचा भरणा गाळेधारकाने केला नाही तर गाळेधारकाला थकीत सेवाशुल्काच्या वसूल योग्य रकमेवर वार्षिक ८ टक्के दराने व्याज आकारणी केली जाणार आहे. सदर योजनेअंतर्गत सप्टेंबर २०२१ पर्यंत पहिला हप्ता भरण्याची मुदत होती. आता दुसरा हप्ता भरण्याची मुदत दि. ३१ मार्च, २०२२ पर्यंत आहे.

मुंबई मंडळातर्फे थकीत सेवाशुल्क/ सुधारित सेवाशुल्क वसुली वाढविण्यासाठी दि. २१ फेब्रुवारी २०२२ ते दि. ३१ मार्च २०२२ या कालावधीत विशेष वसुली मोहीम राबविण्यात येत असून या मोहिमेअंतर्गत संबंधित विभागाचे मिळकत व्यवस्थापक व भाडेवसुलीकर यांचे वसुली पथक नेमण्यात आले आहे. सदर पथकामार्फत आजतागायत २ कोटी ४९ लाख ६० हजार रुपये थकीत सेवाशुल्काची वसुली करण्यात आली आहे. सदर वसुली पथकाला सहकार्य करण्याचे आवाहन मुंबई मंडळातर्फे करण्यात आले आहे.

सही/-
(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / प्राधिकरण